# उमेदवारांना सूचना

अर्जपत्र भरण्यापूर्वी उमेदवारांनी खाली दिलेल्या सर्व सूचना काळजीपूर्वक वाचल्या पाहिजेत. फॉर्म काटेकोरपणे खाली दिलेल्या सूचनांच्या अनुषंगाने भरला पाहिजे. योग्यरित्या, पूर्णपणे आणि सूचनांनुसार न भरलेले अर्ज फेटाळण्यास जबाबदार असतात आणि अशा फेटाळणीची जबाबदारी उमेदवारांवर असेल. अशा फेटाळणीनंतर आयोग कोणतेही दावे विचारार्थ स्वीकारणार नाही. अर्जदाराकडे पदासाठी अर्ज करताना वैध ई-मेल आयडी आणि मोबाईल क्रमांक असणे आवश्यक आहे आणि आयोगाकडून येणारे संदेश/सूचना प्राप्त होण्यासाठी नोकरभरती प्रक्रिया पूर्ण होईपर्यंत तो सक्रिय ठेवणे आवश्यक आहे.

## 1.अर्जपत्र

a) अर्जदाराने गोवा कर्मचारी निवड आयोगाच्या https://gssc.goa.gov.in संकेतस्थळाला भेट द्यावी आणि त्याची/तिची नोंदणी करावी. अर्जदाराने संगणक व्युत्पन्न वापरकर्त्याची आयडी व पासवर्ड भविष्यातील वापरासाठी नोंद करून ठेवावा. एकदा नोंदणी पूर्ण झाल्यानंतर अर्जदार ऑनलाइन अर्जपत्र भरणे हाती घेऊ शकतो.

b) अर्ज भरण्यापूर्वी, अर्जदार jpeg किंवा jpg स्वरुपातील 1 MB पेक्षा कमी आकारातील स्वत:चे पासपोर्ट आकाराचे छायाचित्र आणि त्याची/तिची सही स्कॅन करेल.

c) उमेदवार एकापेक्षा अधिक पदांसाठी अर्ज करीत असल्यास, प्रत्येक पदासाठी वेगळा अर्ज सादर करावा.

d) आयोग ऑनलाइन शिवाय इतर कोणत्याही माध्यमात अर्जपत्र स्वीकारणार नाही.

## 2.अर्जपत्र भरणे

a) सर्व रकाने/बाबी त्यात दिलेल्या पर्यायांनुसार भरावेत. कोणतीही बाब रिक्त ठेवू नये किंवा चुकीची भरू नये, कारण त्यात दिलेली माहिती उमेदवारीची शिफारस करण्याकरिता उमेदवारांची पात्रता व योग्यता ठरविण्यासाठी वापरली जाईल.

b) अर्जपत्रामध्ये शैक्षणिक अर्हतेंतर्गत, उमेदवार “गुणांची टक्केवारी” या रकान्यामध्ये संबधित परीक्षेमध्ये प्राप्त केलेली गुणांची टक्केवारी (%) स्पष्टपणे नमूद करेल. सीजीपीए/जीपीए/एसजीपीए इ. मध्ये श्रेणी देण्याच्या प्रसंगी, गुणांची टक्केवारी एआयसीटीई/यूजीसी ने मंजूर केलेल्या खाली दिलेल्या समतुल्यता कोष्टकानुसार ठरविली जाईल. “या सूचनांचे अनुपालन करण्यात अपयश आल्यास उमेदवारी फेटाळली जाऊ शकते”.

| **श्रेणी पॉईंट** | **टक्केवारी** |
|---|---|
| 6.25 | 55% |
| 6.75 | 60% |
| 7.25 | 65% |
| 7.75 | 70% |
| 8.25 | 75% |

c) अर्ज करायच्या तारखेला उमेदवारांकडे त्यांच्या शैक्षणिक अर्हता, अनुभव इ. च्या सर्व प्रमाणपत्रांची मूळ प्रत आहे हे त्यांनी सुनिश्चित करावे. अर्ज घेण्याच्या शेवटच्या दिवशी जातीचा दाखला वैध आहे हे सुद्धा सुनिश्चित करावे.

d) अर्जपत्राची छापील प्रत आयोगाकडे **पाठवावयाची नाही**.

e) इंटरनेटवर अती ताण पडल्यामुळे किंवा संकेतस्थळ ठप्प झाल्यामुळे डिसकनेक्शन/संकेतस्थळावर लॉग ऑन करण्यात अक्षम/अपयश या शक्यता टाळण्यासाठी उमेदवारांनी शेवटच्या तारखेपूर्वी ऑनलाइन अर्ज व फी भरावी . शेवटच्या तारखेपर्यंत थांबू नये असा सल्ला उमेदवारांच्या हितामध्ये दिला जातो.

f) उपरोक्त कारणांमुळे किंवा आयोगाच्या नियंत्रणापलीकडील कोणत्याही इतर कारणांमुळे उमेदवारांना शेवटच्या तारखेपूर्वी आपले अर्ज सादर करता आले नाहीत तर त्याची कोणतीही जबाबदारी आयोग घेणार नाही.

g) पदाच्या महत्त्वाच्या आवश्यकतांनुसार ऑनलाइन अर्जपत्रामध्ये उमेदवारांनी त्यांच्या अर्हता व अनुभव यांच्याशी संबंधित सर्व तपशील भरले आहेत हे त्यांनी सुनिश्चित करावे. एकदा अर्ज सादर केल्यानंतर प्रत्यक्ष स्वरुपात कोणतीही माहिती स्वीकारली जाणार नाही आणि

उमेदवाराला जर अतिरिक्त माहिती अपलोड कराचयी असल्यास तिने/त्याने त्या विशिष्ट पदासाठीच्या अर्ज सादर करावयाच्या शेवटच्या तारखेपूर्वी पुन्हा अर्ज करावा.

h) उमेदवाराला खालीलप्रमाणे अडचणी आल्यास:
i. वेब पोर्टलवर ऑनलाइन अर्ज सादर करण्यात
ii. अर्ज शुल्क भरण्यात
ते 8530499686 वर संपर्क साधू शकतात आणि/किंवा goacbes-support@gov.in वर समस्या मेल करू शकतात

**उमेदवारांकडून आयोगाच्या कार्यालयीन दूरध्वनी क्रमांकावर किंवा औपचारिक ईमेल आयडीवर कोणतेही फोन कॉल्स किंवा ईमेल्स विचारार्थ स्वीकारले जाणार नाहीत**

## 3. अर्ज शुल्क:

उमेदवारांच्या विविध प्रवर्गांसाठी अर्ज शुल्क खालीलप्रमाणे असतील:

| **प्रवर्ग** | **शुल्क (रु. मध्ये)** | |
|---|---|---|
| | सीसीएस सुधारित वेतन नियम 2016 चा स्तर 1 ते 3 | सीसीएस सुधारित वेतन नियम 2016 चा स्तर 4 व अधिक |
| अराखीव | 200 | 400 |
| अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती | 50 | 100 |
| इतर मागासवर्गीय | 100 | 200 |
| दिव्यांग व्यक्ती | 50 | 100 |
| आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटक | 100 | 200 |

उमेदवाराने वर नमूद केल्याप्रमाणे फी भरणे आवश्यक आहे, असे न केल्यास उमेदवारी नाकारली जाईल.

a) ऑनलाइन अर्जपत्र भरल्यानंतर, उमेदवाराने सूचित केल्याप्रमाणे त्याचे/तिचे पासपोर्ट आकाराचे छायाचित्र व सही अपलोड करावी. अर्जशुल्क भरण्यासाठीची विविध माध्यमे आणि त्यांचे शुल्क खालीलप्रमाणे असेल:-

| **माध्यम** | **शुल्क** |
|---|---|
| | |

| | |
|---|---|
| इंटरनेट बँकिंग | निरंक |
| डेबिट कार्ड | निरंक |
| क्रेडिट कार्ड | शुल्क पेमेंट गेटवेवर निर्दिष्ट केल्याप्रमाणे |
| यूपीआय | निरंक |

नियम 5 उपखंड 10 नुसार, उमेदवाराने वर नमूद केल्याप्रमाणे शुल्क भरणे आवश्यक आहे. त्यात अपयश आल्यास उमेदवारी नाकारली जाण्याची शक्यता आहे.

एकदा अर्जशुल्क भरल्यानंतर, फॉर्म सादर करण्याची प्रक्रिया पूर्ण होईल. त्यानंतर अर्जपत्रामध्ये कोणताही बदल/सुधारणा करण्यास परवानगी नाही.

b) विहित अर्जशुल्काशिवायचा अर्ज, वर वर्णन केलेल्या पद्धतीनुसार लगेच फेटाळला जाईल आणि फेटाळणीविरोधात कोणताही पत्रव्यवहार/निवेदन विचारार्थ स्वीकारले जाणार नाही.

c) अर्जदाराने भरलेले अर्जशुल्क परत न देण्याजोगे आहे.

**4. ऑनलाइन अर्जपत्रासह अपलोड करावयाची कागदपत्रे.**

(a) केवळ jpeg किंवा jpg स्वरुपातील 1 MB पेक्षा कमी आकाराचे पासपोर्ट आकाराचे छायाचित्र (स्कॅन केलेले)

(b) केवळ jpeg किंवा jpg स्वरुपातील 1 MB पेक्षा कमी आकाराची सही (स्कॅन केलेली)

5. वयाची शिथिलता

| **अनु. क्र.** | **प्रवर्ग** | **वयाची शिथिलता** |
|---|---|---|
| a. | अनुसूचित जाती/अनुसूचित जमाती | 05 वर्षे |
| b. | इतर मागासवर्गीय | 03 वर्षे |
| c. | दिव्यांग व्यक्ती | 10 वर्षे |
| d. | दिव्यांग व्यक्ती + अनुसूचित जमाती /अनुसूचित जाती | 15 वर्षे, कमाल वय 56 वर्षांपर्यंत |
| e. | दिव्यांग व्यक्ती + इतर मागासवर्गीय | 13 वर्षे, कमाल वय 56 वर्षांपर्यंत |
| f. | सरकारी कर्मचारी | सरकारने वेळोवेळी जारी केलेल्या सूचनांनुसार 5 वर्षांपर्यंत |
| g. | सरकारी कर्मचारी + अनुसूचित जाती/अनुसूचित जमाती | सरकारने वेळोवेळी जारी केलेल्या सूचनांनुसार 10 वर्षांपर्यंत |

| | | |
|---|---|---|
| h. | विविध सरकारी खात्यांमध्ये काम करणारे कंत्राटी कर्मचारी. | सरकारी खात्यांमध्ये असलेली एकूण कंत्राटी सेवा, ही अधिकाधिक 5 वर्षे असू शकते. |

- दिव्यांग व्यक्तींच्या बाबतीत, पद राखीव असो किंवा नसो, वयोमर्यादेतील शिथिलता लागू होईल, परंतु त्या पदाला दिव्यांग व्यक्तींसाठी योग्य म्हणून मान्यता मिळालेली असावी.
- खात्याचा कर्मचारी असल्याने एखादी व्यक्ती वयाच्या शिथिलतेसाठी पात्र असल्यास, त्याच्यासाठी/तिच्यासाठी लाभदायक असेल त्याप्रमाणे 'दिव्यांग व्यक्ती' किंवा 'खात्याचा कर्मचारी' म्हणून ते ग्राह्य धरले जाईल.

## 6. 'सेवेत असलेल्या' उमेदवारांकडून अर्ज.

A) थेट भरतीच्या बाबतीत सरकारी कर्मचारी जेव्हा थेट आयोगाकडे अर्ज करतात तेव्हा, त्यांनी त्यांच्या कार्यालयाच्या/खात्याच्या प्रमुखांना त्यांनी अर्ज केलेल्या परीक्षेचे/पदाचे तपशील देऊन त्वरित कळवावे, आणि त्यांची परवानगी थेट आयोगाला कळविण्याची विनंती करावी. तथापि, जर, कार्यालयाच्या / खात्याच्या प्रमुखांना मागितलेली परवानगी रोखून धरणे आवश्यक वाटल्यास, त्यांनी अर्ज स्वीकारण्याच्या शेवटच्या तारखेपूर्वी तीस दिवसांच्या आत त्यानुसार आयोगाला कळवावे. खाते प्रमुखांनी अर्ज रोखणे हे परिस्थितीनुसार योग्य असल्यास त्याची माहिती अर्ज स्वीकारण्याच्या शेवटच्या तारखेपूर्वी तीस दिवसांच्या आत आयोगाला त्वरित द्यावी. सरकारी कर्मचाऱ्याच्या प्रत्यक्ष निवडीच्या प्रसंगी, आरोपपत्र/खटला मंजूर झाल्यास किंवा फौजदारी खटल्यासाठी आरोपपत्र दाखल केल्यास, किंवा सरकारी कर्मचाऱ्याला निलंबित केल्यास, त्याला नेमणूक स्कीकारण्यासाठी सेवेतून मुक्त केले जाणार नाही, हे सुद्धा स्पष्ट करावे.

B) एकदा प्रशासकीय प्राधिकाऱ्याने अर्ज पुढे पाठविल्यानंतर, संबंधित सरकारी कर्मचाऱ्याला नवीन नेमणूक स्वीकारण्यासाठी सेवामुक्त करणे अनिवार्य आहे. तथापि, अर्ज पुढे पाठविल्यानंतर, पण निवडीच्या पूर्वी, अपवादात्मक परिस्थिती उद्भवल्यास ज्यामध्ये अधिकाऱ्याला सेवामुक्त करणे शक्य नसल्यास, ते आयोगाला तसेच संबंधित अधिकाऱ्याला कळवावे. अधिकाऱ्याला सेवामुक्त न करण्याचा निर्णय वर संदर्भित केलेल्या परिस्थिती खरेच अपवादात्मक असल्यासच घ्यावा.

## 7. राखीवतेचे लाभ

(a) गोवा सरकारने वेळोवेळी जारी केलेल्या विद्यमान सूचना/आदेश/परिपत्रक यांच्या अनुषंगाने अनुसूचित जाती/अनुसूचित जमाती/इतर मागासवर्गीय/आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटक/दिव्यांग व्यक्ती/माजी सैनिक व इतर विशेष प्रवर्गातील उमेदवारांना राखीवतेचे लाभ

उपलब्ध असतील. पदासाठी ऑनलाइन अर्ज करताना उमेदवाराने विशिष्ट प्रवर्ग निवडला पाहिजे. नंतरच्या कोणत्याही टप्प्यावर प्रवर्गातील बदलासाठीची विनंती विचारार्थ स्वीकारली जाणार नाही.

(b) विविध पदांसाठी नियुक्ती प्राधिकाऱ्यातर्फे दिलेल्या रिक्त पदांच्या अनुरोधाने आयोग उमेदवारांची निवड करते. कोणत्याही नियुक्ती प्राधिकाऱ्याच्या रिक्त पदांची संख्या ठरविण्यात आयोगाची कोणतीही भूमिका नाही. राखीवता धोरणाची अंमलबजावणी करणे, राखीवता नामावली राखणे आणि विविध प्रवर्गांमधील रिक्त पदे चिन्हांकित करणे हे नियुक्ती प्राधिकाऱ्याच्या अधिकारक्षेत्राखाली येते.

(c) लागू असेल तेथे कोणत्याही लाभांच्या विस्तारासाठी उमेदवारांची पात्रता निश्चित करण्याकरिता अर्जाची शेवटची तारीख ही अंतिम तारीख असेल.

(d) गोवा सरकारने अधिसूचित केलेल्या समुदायांना इतर मागासवर्गीय प्रवर्गांतर्गत राखीवता/वयाची शिथिलता यांचा लाभ दिला जाईल.

(e) अराखीव प्रवर्गातील उमेदवारांना लागू असलेल्या मानकांवर तात्पुरती शिफारस केलेल्या अनुसूचित जाती/अनुसूचित जमाती/इतर मागासवर्गीय यांमधील उमेदवार जो संयुक्त गुणवत्ता यादीत येतो त्याला स्व-गुणवत्ता उमेदवार म्हणून पाहिले जाते. अशा उमेदवाराला राखीवता नामावलीवर अराखीव बाबीमध्ये समायोजित केले जाते. अराखीव प्रवर्गातील उमेदवारांना लागू असलेल्या मानकांवर निवडण्यात आलेले अनुसूचित जाती/अनुसूचित जमाती/इतर मागासवर्गीय यांमधील केवळ असे उमेदवार राखीव रिक्त पदांमध्ये समायोजित केले जाणार नाहीत. म्हणजेच, शिथिल मानक लागू करून अनुसूचित जाती/अनुसूचित जमाती/इतर मागासवर्गीय उमेदवार निवडताना, उदाहरणार्थ, वयोमर्यादा, अनुभव, अर्हता इ. , अनुसूचित जाती/अनुसूचित जमाती/इतर मागासवर्गीय उमेदवारांची गणना राखीव रिक्त पदांमध्ये केली जावी. असे उमेदवार अराखीव रिक्त पदांमध्ये घेण्यासाठी अनुपलब्ध असल्याचे मानले जाईल.

## 8.पात्रता निकष

(a) उमेदवार गेली 15 वर्षे गोवा राज्याचा रहिवासी असावा आणि त्याच्याकडे सक्षम प्राधिकरणाने जारी केलेला दाखला असावा.

(b) ज्या पदासाठी त्याला/तिला अर्ज करण्याची इच्छा आहे त्या पदाच्या सेवाप्रवेश नियमावलीनुसारच्या वय, शैक्षणिक अर्हता, अनुभव इ. बाबतीत उमेदवार पात्र असावा.

(c) जाहिरातीत निर्धारित केलेली शैक्षणिक अर्हता, वय, अनुभव इ. अर्जाच्या शेवटच्या तारखेला निश्चित केले जाईल.

(ड) विशिष्ट प्रवर्गांतर्गत अर्ज करणाऱ्या अर्जदाराकडे संबंधित प्रवर्गासाठी आवश्यक प्रमाणपत्र असणे आवश्यक आहे. उदाहरणार्थ, माजी सैनिक प्रवर्गांतर्गत अर्ज करणाऱ्या अर्जदाराकडे सैन्य दलांकडून दिलेले सेवा समाप्तीचे प्रमाणपत्र  किंवा सेवा मुक्तता प्रमाणपत्र किंवा पेन्शन देयक आदेश यापैकी कोणतेही एक असणे आवश्यक आहे. अर्जदाराला माजी सैनिक (केंद्र सरकारच्या नागरी सेवांमध्ये व पदांवर पुनर्नियुक्ती) नियम, 1979 तसेच वेळोवेळी झालेल्या सुधारणा यानुसार माजी सैनिकांना मिळणाऱ्या लाभांसाठी पात्र असणे आवश्यक आहे.

## 9. निवड प्रक्रिया

(a) प्रत्येक पदासाठीच्या परीक्षेमध्ये प्रत्येक उमेदवाराला प्राप्त झालेल्या गुणांच्या आधारे, आयोग गुणवत्तेवर उमेदवारांची निवड करेल.

(b) निवडलेल्या उमेदवारांच्या प्राथमिक सूचीमध्ये जाहिरात केलेल्या रिक्त पदांची संख्या तसेच प्रत्येक प्रवर्गातील अशा पदांच्या प्रतीक्षा यादीमधील 25% किंवा दोन उमेदवार, जे जास्त असेल ते यांचा समावेश असेल.

(c) आयोग प्रथम, बेंचमार्क दिव्यांगत्व व्यक्ती प्रवर्ग व माजी सैनिक प्रवर्ग यामधील उमेदवारांची गुणवत्तेच्या आधारे निवड हाती घेईल. अशा प्रकारे निवडलेल्या उमेदवारांना ते ज्या प्रवर्गातील आहेत म्हणजे अराखीव, अनुसूचित जमाती, अनुसूचित जाती आणि इतर मागास वर्गीय, यामध्ये समायोजित केले जाईल. या प्रवर्गातील रिक्त पदे त्या प्रमाणात कमी केली जातील. या प्रवर्गातील उमेदवार उपलब्ध नसल्याच्या बाबतीत, अशा जाहिरात केलेल्या रिक्त पदांची संख्या अराखीव प्रवर्गातून वजा केली जाईल. उदाहरणार्थ, जाहिरात केलेली पदे जर 10 आहेत. ती म्हणजे, 05 अराखीव, 02 अनुसूचित जमाती, 01 अनुसूचित जाती आणि 02 इतर मागास वर्गीय. त्यापैकी 01 पद बेंचमार्क दिव्यांगत्व व्यक्ती प्रवर्ग आणि 01 पद माजी सैनिक प्रवर्ग यामधून भरावयाचे आहे आणि बेंचमार्क दिव्यांगत्व व्यक्ती प्रवर्ग यामधील उमेदवार अनुपलब्ध असल्यास, ते अराखीव प्रवर्गातून वजा केले जाईल म्हणजे 5-1=4 म्हणजे आयोग अराखीव प्रवर्गातील फक्त 04 उमेदवारांची निवड हाती घेईल.

(d) आयोग परीक्षेत मिळालेल्या गुणांच्या उतरत्या क्रमानुसार अराखीव प्रवर्गातील उमेदवारांची निवड हाती घेईल.

(e) उमेदवाराने वयाच्या शिथिलतेचा लाभ घेतलेला नाही किंवा शुल्क भरण्याव्यतिरिक्त इतर कोणतीही सवलत/शिथिलता घेतलेली नाही या अटीच्या अधीन राहून, राखीव प्रवर्गातील उमेदवारांच्या बाबतीत, जे परीक्षेतील त्यांच्या गुणवत्तेनुसार अराखीव प्रवर्गात निवडीसाठी पात्र आहेत, त्यांचे अराखीव प्रवर्गात समायोजन केले जाईल.

(f) आयोगाने अराखीव प्रवर्गातील उमेदवारांची यादी अंतिम केल्यानंतर, तो राखीव प्रवर्गातील उमेदवारांची निवड सूची तयार करण्याचे काम हाती घेईल.

(g) आयोग निवड यादीव्यतिरिक्त अर्जदारांच्या गुणांच्या आधारे त्यांच्या संबंधित प्रवर्गानुसार एक स्वतंत्र प्रतिक्षा यादीही तयार करेल, जी रिक्त पदांच्या 40% पर्यंत किंवा पाच अर्जदारांपर्यंत, यापैकी जे अधिक असेल तितकी असेल: मात्र, विभागाकडून अशा स्वरूपाची विनंती प्राप्त झाल्यानंतरच आणि ते ही निवड यादीतील अर्जदाराने नेमणुकीचा प्रस्ताव न स्वीकारल्यास किंवा अशा पदासाठी अयोग्य ठरल्यास प्रतिक्षा यादीतील अर्जदारांचा विचार केला जाईल.

(h) अशा पदांसाठी पुढील परीक्षेची तारीख जाहीर झाल्यानंतर किंवा अशी प्रतीक्षा सूची प्रसिद्ध झाल्याच्या तारखेपासून एक वर्षाच्या कालावधीनंतर यापैकी जे आधी असेल ते, मागील भरतीच्या पदांची प्रतीक्षा सूची संपुष्टात येईल.

## 10. उमेदवारांची पदनियुक्ती

(a) विविध खात्यांमध्ये उमेदवारांची पदनियुक्ती आयोगाच्या निर्णयावर आधारित असेल. आयोग, निवडलेल्या उमेदवारांची गुणवत्तेच्या उतरत्या क्रमाने क्रमवार मांडणी करण्यासह, प्रत्येक खात्यातील पद/पदांची संख्या, प्रत्येक प्रवर्गातील भरती प्रक्रियेचा भाग बनणाऱ्या खात्यांची संख्या यानुसार प्रमाणशीर प्रतिनिधित्वाची संकल्पना अनुसरू शकतो.

(b) आयोगाचा निर्णय अंतिम असेल. उमेदवाराकडून तसेच नियुक्ती प्राधिकाऱ्याकडून खात्यातील वाटपातील बदल करण्याची कोणतीही विनंती आयोग विचारार्थ स्वीकारणार नाही.

## 11. अतिरिक्त कागदपत्रे/तपशील मागविणे

आयोग इच्छेनुसार कोणत्याही टप्प्यावर अर्ज प्राप्त झाल्यानंतर, संगणक आधारित परीक्षा झाल्यानंतर किंवा त्यानंतर कोणत्याही टप्प्यावर आणि कधीही अर्जदारांकडून अधिक माहिती मागवू शकतो. अशा माहिती आयोगाने दिलेल्या मुदतीत व त्याच्या समाधानकारक स्वरूपात सादर केली नाही, तर अर्जदाराची पुढील परीक्षेसाठी, पात्रता निश्चित करण्यासाठी किंवा शिफारसीसाठी पात्रता मान्य केली जाणार नाही.

## 12. अभियाचना करणे आणि आर्जव करणे

उमेदवाराने कोणत्याही स्वरूपात अभियाचना करणे किंवा आर्जव करणे किंवा आयोगावर कोणत्याही प्रकारे प्रभाव टाकणे उमेदवारास अपात्र ठरवेल आणि त्यासंदर्भात आयोगाचा निर्णय अंतिम असेल.

## 13. गैरवर्तणुकीविरूद्ध चेतावणी

खोटे तपशील किंवा माहिती देऊ नका. कोणतीही भौतिक माहिती लपवू नका. सादर केलेली कोणतीही कागदपत्रे किंवा साक्षांकित प्रती बनवू नका, बनावट बनवू नका, त्यात बदल करू नका किंवा छेडछाड करू नका. उमेदवार वेगवेगळ्या नावांनी/आडनावांनी ओळखला जात असल्यास, त्याने/तिने सक्षम प्राधिकारणाकडून विवाह दाखला किंवा विचलन दाखला यासारखे योग्य पुरावे सादर केले पाहिजेत. एखाद्या उमेदवाराने आपल्या उमेदवारीला मदत व्हावी म्हणून कोणत्याही प्रकारे, किंवा तोतयागिरी करणे, किंवा बनावट कागदपत्रे किंवा छेडछाड केली गेलेली कागदपत्रे मिळवणे किंवा सादर करणे किंवा परीक्षेदरम्यान खोटी विधाने करणे किंवा अनुचित मार्गांचा वापर करणे, किंवा उत्तरपत्रिकांमध्ये बीभत्स भाषा किंवा अश्लील बाबींसह असंबद्ध बाबी लिहिणे किंवा परीक्षा सभागृहामध्ये कोणत्याही प्रकारे गैरवर्तन करणे किंवा चाचणी घेण्यासाठी आयोगाने/किंवा त्याची एजन्सीने नियुक्त केलेल्या कर्मचाऱ्यांना त्रास देणे किंवा शारीरिक इजा करणे किंवा वर नमूद केलेली सर्व किंवा कोणतीही कृत्ये करण्याचा

प्रयत्न करणे किंवा करण्यास प्रोत्साहन देणे याबद्दल दोषी असलेला किंवा आयोगाला दोषी आढळलेला उमेदवार  गुन्हेगारी खटल्याला सामोरे जाण्यासाठी तो/ती जबाबदार असण्यासोबतच, खालीलसाठी जबाबदार असू शकतो/शकते:

a) ज्या पदासाठी तो/ती अर्जदार आहे त्या पदाच्या निवडीसाठी आयोगाकडून अपात्र ठरविण्यास; किंवा

b) आयोगाने घेतलेल्या कोणत्याही परीक्षा किंवा निवडीपासून कायमस्वरूपी किंवा  विनिर्दिष्ट कालावधीसाठी मनाई होण्यास; किंवा

c) योग्य नियमांनुसार शिस्तभंगाच्या कारवाईची शिफारस करण्यासाठी, जर तो/ती आधीच सरकारी सेवेत असेल.

## 14. परीक्षा/कौशल्य चाचणी/शारीरिक सहनशक्ती चाचणी यासाठी बोलावल्याचा अर्थ निवड झाली असा नाही

पदासाठी विहित केलेली आवश्यक अर्हता त्याच्याकडे/तिच्याकडे आहे की नाही याची त्याने/तिने पडताळणी करणे, ही जबाबदारी पदासाठी अर्ज करणाऱ्या उमेदवाराची आहे. परीक्षेला बसण्याची केवळ सूचना मिळाल्याने उमेदवार या पदासाठी पात्र आहे असे होत नाही. कोणत्याही टप्प्यावर, उमेदवाराकडे आवश्यक अर्हता नसल्याचे आढळून आल्यास, त्याची उमेदवारी रद्द झाल्याचे मानले जाईल.

## 15. आयोगाचा निर्णय अंतिम असेल

आयोगाने शिफारशींबाबत घेतलेले निर्णय अंतिम असतात आणि या संदर्भात उमेदवाराकडून केलेला कोणताही पत्रव्यवहार/निवेदन विचारार्थ स्वीकारले जाणार नाही. परीक्षा/नियुक्ती इत्यादीसाठी उमेदवारांची निवड न झाल्याच्या कारणांसाठी आयोग त्यांच्याशी चौकशी/पत्रव्यवहार करत नाही.

## 16. नियुक्ती प्राधिकारी

आयोगाने जाहिरात केलेल्या पदांसाठी नियुक्ती प्राधिकारी आयोग नसून संबंधित खाते प्रमुख असतात. आयोग केवळ त्याने निवडलेल्या उमेदवाराच्या/उमेदवारांच्या नावाची/नावांची शिफारस खात्याकडे करते. त्यामुळे, दिलेल्या किंवा देण्यात येणाऱ्या नियुक्तीसंदर्भात किंवा नियुक्तीच्या अटींसंदर्भात आयोग कोणत्याही उमेदवाराकडून आलेली कोणतीही चौकशी/पत्रव्यवहार विचारार्थ स्वीकारणार नाही.

**17. वैद्यकीय योग्यता**

शिफारस केलेले उमेदवार त्यांच्या नियुक्तीपूर्वी, सरकारने विहित केलेल्या वैद्यकीय चाचणीच्या अधीन असतात. जर तो/ती पदासाठी वैद्यकीयदृष्ट्या अपात्र असल्याचे आढळून आल्यास, आयोगाने शिफारस केली असली तरी तो/ती नियुक्ती प्राधिकाऱ्याद्वारे नियुक्तीसाठी पात्र ठरणार नाही..

**18. पूर्ववृत्त आणि प्रमाणपत्रांची सत्यता**

शिफारस केलेल्या उमेदवारांची त्यांच्या नियुक्तीपूर्वी, नियुक्ती प्राधिकाऱ्याद्वारे त्यांच्या पूर्ववृत्तांबद्दल चौकशी केली जाते आणि अर्हता प्रमाणपत्रांच्या सत्यतेची पडताळणी केली जाते.

**19. रूजू होण्याचा अवधी**

पदासाठी शिफारस केलेल्या आणि कामावर रुजू होणे आवश्यक असलेल्या उमेदवाराने नियुक्ती प्राधिकाऱ्याच्या नियुक्ती आदेशानुसार विनिर्दिष्ट अवधीत कामावर हजर राहिले पाहिजे. उमेदवाराला रूजू होण्याच्या अवधीसाठी द्यावयाचा कालावधी नियुक्ती प्राधिकाऱ्याच्या विवेकाधीन असेल.

**20. अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती आणि इतर मागासवर्गीय उमेदवारांची पात्रता**

अनुसूचित जाती/ अनुसूचित जमाती/इतर मागास वर्गातील असल्याचा दावा करणाऱ्या उमेदवारांनी, अनुसूचित जाती/ अनुसूचित जमाती/ इतर मागासवर्गीय प्रवर्गात त्याच्या/तिच्या जातीचा/समुदायचा समावेश करण्यासंदर्भात आणि विहित नमुन्यात सक्षम प्राधिकरणाकडून जात दाखला मिळविण्याच्या उद्देशासाठी गोवा सरकारने वेळोवेळी जारी केलेल्या अधिसूचनेचे पालन करावे. (खोटे/बनावट जात/जमातीचे दाखले सादर करणे हा गंभीर गुन्हा आहे)

**21. दिव्यांग व्यक्ती असलेल्या उमेदवारांची पात्रता**

दिव्यांग व्यक्ती असल्याचा दावा करणाऱ्या उमेदवारांनी, पदासाठी परवानगी दिलेल्या दिव्यांग व्यक्तींच्या प्रकाराचा समावेश करण्यासंदर्भात आणि विहित नमुन्यात सक्षम प्राधिकरणाकडून योग्य दाखला मिळविण्याच्या उद्देशाने गोवा सरकारने वेळोवेळी जारी केलेल्या अधिसूचनेचे पालन करावे.

**22. माजी-सैनिक असलेल्या उमेदवारांची पात्रता**

माजी सैनिक अर्जदारांनी त्यांच्या हक्काच्या समर्थनार्थ सैन्य दलांकडून दिलेले सेवा समाप्तीचे प्रमाणपत्र, पेन्शन देयक आदेश किंवा प्रादेशिक सैनिक मंडळाकडून किंवा इतर सक्षम प्राधिकरणाकडून दिलेले प्रमाणपत्र, निर्धारित नमुन्यात सादर करणे आवश्यक आहे.

**23. स्वातंत्र्यसैनिकांची मुले असलेल्या उमेदवारांची पात्रता**

स्वातंत्र्यसैनिकांची मुले असलेल्या उमेदवारांनी त्यांच्या दाव्याच्या समर्थनार्थ विहित नमुन्यात सक्षम प्राधिकरणाचा दाखला सादर करणे आवश्यक आहे.

**24.**गुणवत्ता प्राप्त खेळाडू असलेल्या अर्जदारांची पात्रता:

गुणवत्ताधारित खेळाडू प्रवर्गांतर्गत अर्ज करणाऱ्या अर्जदारांकडे गोवा शासनाच्या क्रीडा व युवक व्यवहार विभागाकडून फॉर्म 4 मध्ये दिलेले प्रमाणपत्र असणे आवश्यक आहे. या प्रवर्गांतर्गत अर्ज करण्यासाठी अन्य कोणतेही प्रमाणपत्र वैध मानले जाणार नाही.

**25**. अनुसूचित जाती किंवा अनुसूचित जमाती, इतर मागासवर्गीय, दिव्यांग व्यक्ती, माजी-सैनिक आणि स्वातंत्र्यसैनिकांची मुले यांच्यासाठी राखीव असलेल्या पदाची/पदांची जाहिरात, सरकारच्या धोरणानुसार आणि या संदर्भात वेळोवेळी जारी करण्यात आलेल्या सूचनांनुसार एकदा किंवा एकापेक्षा जास्त वेळा दिली जाईल.

26. अर्जदारांनी आयोगाच्या संकेतस्थळाला नियमितपणे भेट देऊन पुढील सूचना वाचाव्यात. संगणक आधारित परीक्षेस उपस्थित राहण्यापूर्वी त्यासंदर्भातील सूचना व तक्रार निवारण प्रणाली आयोगाच्या संकेतस्थळावरून काळजीपूर्वक वाचणे आवश्यक आहे.

**<u>महत्त्वाची टीप:</u>**

येथे, विविध बाबींवर अर्ज फेटाळण्यासंदर्भातील तरतुदींचा हेतू म्हणजे, पाठविलेले अर्ज पूर्ण व परिपूर्ण आहेत हे सुनिश्चित करणे आणि पूर्ण व परिपूर्ण अर्ज पाठविणाऱ्या कोणत्याही उमेदवाराला होणारी गैरसोय व अन्याय टाळणे हा आहे.

**<u>पात्रता, अर्ज स्वीकारणे किंवा अर्ज फेटाळणे, खोट्या माहितीसाठी दंड देणे, निवड पद्धती, परीक्षा आयोजित करणे, परीक्षा केंद्रांचे वाटप करणे आणि गुणवत्ता यादी तयार करणे व पद वाटप, गैरप्रकारत गुंतल्याबद्दल प्रतिबंध यासंबंधित सर्व बाबींमध्ये आयोगाचा निर्णय अंतिम असेल आणि उमेदवारांना बंधनकारक असेल आणि या संदर्भात कोणतीही चौकशी/पत्रव्यवहार विचारार्थ स्वीकारला जाणार नाही.</u>**

**<u>अस्वीकरण:- रिक्त पदांची नोटीस नियुक्ती प्राधिकाऱ्याकडून प्राप्त झालेल्या मागणीवर आधारित असते. नियुक्ती प्राधिकाऱ्याने प्रदान केलेल्या पदांच्या सेवाप्रवेश नियमावलीत विहित केल्याप्रमाणे आवश्यक अर्हता देण्यात आली आहे. टंकलेखनातील त्रुटीच्या बाबतीत, भरती फक्त सेवाप्रवेश नियमावलींनुसार काटेकोरपणे केली जाईल.</u>**

*********